नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १६२ Issue - 162 | वार शनिवार दि. १ नोव्हेंबर २०२५ Blow- Saturday Date 1 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# डॉक्टर तरुणी आत्महत्येप्रकरणी एसआयटी स्थापन

## मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश; महिला आयपीएस अधिकारी करणार तपास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : फलटणमधील डॉक्टर तरुणीच्या प्रकरणामध्ये एसआयटीच्या स्थापनेचे आदेश मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आहेत. राज्याचे गृहमंत्री फडणवीसांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांना हे आदेश दिले आहेत.फलटणप्रकरणी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली एक एसआयटी स्थापन करण्यात यावी असे हे आदेश आहेत. त्यामुळे फलटण प्रकरणात महाराष्ट्र सरकार आता ॲक्शन मोडमध्ये आलेलं पाहायला मिळत आहे.

फलटण प्रकरणात पोलिसच आरोपी असल्याने पोलिसांवर, त्यांच्या तपासावर आरोप होत असल्याने महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या हातात हा तपास देण्यात येणार असल्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. त्यामुळे आता महिला अधिकारीच या प्रकरणाचा तपास करताना पाहायला मिळणार आहेत.

दरम्यान, डॉक्टर तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी विशेष तपास पथकाकडे वर्ग करण्याची मागणी अनेक राजकीय नेते, पक्ष व सामाजिक कार्यकर्त्यांकडून केली जात होती. डॉक्टर तरुणीच्या कुटुंबाचीही तशी मागणी होती. या मागणीतून दोषींना कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी जोर धरुन होती. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात काही राजकीय व्यक्तींवरही आरोप करण्यात आले आहेत. त्यांच्याही अटकेची मागणी होत असताना आता या एसआयटी पथकाच्या स्थापनेनंतर पुढे काय घडतं याकडे सर्वांचं लक्ष असणार आहे.

दरम्यान, या प्रकरणातले प्रमुख आरोपी प्रशांत बनकर व आयपीएस गोपाळ बदने या दोघांनाही पोलिसांनी अटक केलेली आहे. व त्यांची कस्टडीही न्यायालयाने पोलिसांना दिलेली आहे. सखोल तपास, व या दोन आरोपींचा एकमेकांशी काही संबंध आहे का हे सर्व तपशील तपासण्यासाठी सरकारी वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद केला होता. ज्याला न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकल्यानंतर ५ दिवसांची कस्टडी दिली होती.

फलटणमधील उपजिल्हा रुग्णालयात काम करणाऱ्या डॉक्टर तरुणीने स्वतःच्या हातावर आरोपींची नावे लिहित आत्महत्येसारखं पाऊल उचललं होतं. तिने यावेळी पीएसआय गोपाळ बदनेने आपल्यावर ४ वेळा अत्याचार केल्याचं म्हटलं होतं, तर



दुसरा आरोपी प्रशांत बनकरने आपला मानसिक व शारीरिक छळ केल्याचं लिहिलं होतं.

# जिल्हा व्यवसाय सुधारणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार देण्यात येणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात 'जिल्हा व्यवसाय सुधारणा कृती योजना २०२५' राबविण्यात येत आहे. १५४ सुधारणांचा समावेश असलेल्या या उपक्रमाची अंमलबजावणी १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत केली जाणार आहे. यात राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांसाठी 'चिंतन शिबिर' आणि विभागीय बैठकांचे आयोजन करण्यात येणार असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्याधिकाऱ्यांना अधिक अधिकार प्रदान करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी 'इज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस मुख्य सचिव राजेशकुमार तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी तर दूरदृश्यप्रणालीद्वारे राज्यातील विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्याच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ६ विभागीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, त्या ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी आपले अहवाल सादर

### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' संदर्भात उद्योग विभागाचा आढावा

करतील. यातील नाशिक विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वाखाली 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' सुधारणा समिती कार्यरत आहे, तर विजय सूर्यवंशी (कोकण विभाग) आणि जितेंद्र पापळकर (छत्रपती संभाजीनगर विभाग) अनुक्रमे औद्योगिक संसाधन वापर आणि भू-बँक प्रोत्साहन या विषयांवर लक्ष केंद्रित करत आहेत.

बैठकीदरम्यान राज्यातील 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' प्रगती, अंमलबजावणी केलेल्या सुधारणा तसेच आगामी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्राने 'ईज ऑफ डुईंग बिझनेस २०२४' मूल्यांकनात लक्षणीय प्रगती साधली असून ४०२ पैकी ३९९ सुधारणा पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळे राज्याचा अंमलबजावणी स्कोअर ९९.२५ टक्क्यांवर पोहोचला आहे. महाराष्ट्राला यापूर्वी 'ईज ऑफ डुईंग बिझनेस' २०२०-२१' मध्ये अचिव्हर आणि 'ईओडीबी२०२२' मध्ये टॉप अचिव्हर म्हणून गौरविण्यात आले होते. 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस २०२४' चा अंतिम निकाल ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे. 'ईज ऑफ डुईंग बिझिनेस' अंतर्गत भूखंड आणि बांधकाम परवाने, कामगार सुधारणा, उपयुक्तता आणि तपासणी प्रणाली तसेच नियामक सुलभीकरण ही प्रमुख लक्ष्यकेंद्रीत क्षेत्रे आहेत. त्याचबरोबर मैत्री २.० द्वारे संपूर्ण एकल-खिडकी परिसंस्था कार्यान्वित करण्याची योजना आहे. त्याचबरोबर सिंगल साइन-ऑन, परवान्यांची स्थिती, सामान्य अर्ज फॉर्म, एकत्रित पेमेंट, डॅशबोर्ड्स, तपासणी, तक्रार निवारण आणि वापरकर्ता अभिप्राय यासारखे आवश्यक मॉड्यूल्स मैत्री २.० मध्ये समाविष्ट असणार आहेत.

महाराष्ट्रात व्यवसाय सुलभता, नियमनमुक्ती आणि क्षेत्रीय मंजुरी सुलभीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली जात आहेत. उद्योगांना अधिक अनुकूल आणि पारदर्शक वातावरण मिळावे यासाठी प्रमुख सुधारणा करण्यात येत आहेत.

केंद्र सरकारच्या औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) च्या 'बिझनेस रिफॉर्म ॲक्शन प्लॅन' (बीआरएपी) नुसार, २०१५ पासून महाराष्ट्र सातत्याने देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यांपैकी एक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# 'महाराष्ट्र केसरी' विजेता पैलवान सिकंदर शेखला अटक

सोलापूर : आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि महाराष्ट्र केसरी विजेता पैलवान सिकंदर शेख याला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. पंजाब पोलिसांनी अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात सिकंदरला अटक केली असून त्याचा या रॅकेटमध्ये सहभाग असल्याचा आरोप आहे. सिकंदर शेखवर पंजाब पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर महाराष्ट्रातील कुस्ती क्षेत्र हादरले आहे.

राजस्थानमधील पपला गुर्जर टोळीशी सिकंदरचे संबंध असल्याचे तपासात समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे पंजाब पोलिसांनी सांगितले आहे. सिकंदरच्या कुटुंबियांशी संपर्क केला असता त्यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील रहिवासी असलेला महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख याच्यासह चौघांना सीआयए पथकाने शस्त्र तस्करी प्रकरणात मोहाली (पंजाब) येथे अटक केली आहे. सिकंदरला एकीकडे कुस्तीत यश मिळालेले



असतानाच, दुसरीकडे अवैध शस्त्र तस्करी प्रकरणात अटक झाल्याने कुस्ती क्षेत्राला जबरदस्त हादरा बसला आहे. सिकंदर हा सध्या पंजाब राज्यातील मुल्लापूर गरीबदास येथे सराव करत आहे.

हरियाणा आणि राजस्थानातील कुख्यात पपला गुर्जर टोळीशी त्याचा थेट संबंध असल्याचा पोलिसांना संशय आहे. दानवीर आणि त्याचा साथीदार बंटी हे २४ ऑक्टोबर रोजी एसयूव्ही गाडीतून दोन शस्त्रे घेऊन मोहालीत आले होते. ही शस्त्रे सिकंदर शेखकडे देण्याचे ठरले होते. संबंधित शस्त्रे कृष्ण ऊर्फ हॅप्पीकडे पुरवण्याची जबाबदारी सिकंदर शेखवर होती.

पंजाब पोलिसांनी चारही संशयीत आरोपींकडून १.९९ लाख रुपयांची रोखड, पाच पिस्तुले, काडतुसे, दोन एसयूव्ही गाड्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी खरड (पंजाब) पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यात २०२३ मध्ये झालेल्या महाराष्ट्र केसरीच्या माती गटातील अंतिम फेरीत पंचाच्या निर्णयावर आक्षेप घेतल्यामुळे सिकंदर शेख प्रसिद्धीच्या झोतात आला होता. त्याच्या पुढच्या वर्षी २०२४ मध्ये त्याने महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू असल्यामुळे त्याला क्रीडा कोट्यातून लष्करात भरतीही करुन घेण्यात आले होते. मात्र नंतर त्याने ही नोकरी सोडली. गेल्या पाच-सहा महिन्यांपासून तो पंजाबमध्येच वास्तव्यास आहे.

# संजय राऊतांच्या प्रकृतीत गंभीर बिघाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राजकारणात कुणी कुणाचा कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो असं म्हणतात. गेल्या काही वर्षांपासूनच्या घडामोडींनी हे दाखवून दिलंच आहे. कित्येक वर्षे एकमेकांसोबत राहणारे पक्ष शिवसेना आणि भाजप यांच्यात कटुता आली. शिवसेना सारखा पक्ष फुटला. तर राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची मैत्री झाली. खासदार संजय राऊत उद्धव ठाकरे यांचे हे खंदे समर्थक मानले जातात. उद्धव ठाकरे यांना संजय राऊतांची कठीण काळात मोलाची साथ लाभली आहे. पण संजय राऊत सध्या आजारी आहेत. त्यांच्या प्रकृतीत गंभीर स्वरुपाचा बिघाड झाल्याची माहिती स्वत: राऊतांनी ट्विट करुन दिली आहे. त्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये चिंता वाढली आहे.

### पीएम मोदींकडून विचारपूस

विशेष म्हणजे राऊतांच्या या ट्विटनंतर अनेकांकडून त्यांनी लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना केली जात आहे. यामध्ये राजकारण बाजूला सारून माणुसकी आणि राजकीय संस्कृतीचं दर्शन घडल्याचं बघायला मिळत आहे. कारण खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संजय राऊत यांच्यासाठी ट्विट केलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट केलं आहे. संजय राऊत जी, तुमच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी आणि तुमच्या उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना करतो, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी 'एक्स'वर (द) म्हणाले आहेत.



आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले, पण सध्या अचानक माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले. उपचार सुरू आहेत, मी यातून लवकरच बाहेर पडेन. वैद्यकीय सल्ल्यानुसार मला बाहेर जाणे आणि गर्दीत मिसळणे यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यास नाईलाज आहे. मला खात्री आहे मी ठणठणीत बरा होऊन साधारण नवीन वर्षात आपल्या भेटीस येईन. आपले प्रेम आणि आशीवाद असेच राहू द्या, असं ट्विट संजय राऊत यांनी केलं. त्यांचं हेच ट्विट रिट्विट करत पंतप्रधान मोदींनी राऊतांनी लवकरे बरे व्हावे यासाठी सदिच्छा दिल्या. पंतप्रधान मोदी यांच्या या ट्विटची सध्या सर्वत्र चर्चा होऊ लागल्या आहेत.

### २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुक होणार

# निवडणूक घोषणा येत्या आठवड्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रभाग रचना, इतर मागासवर्गांचे आरक्षण यांसारख्या विविध मुद्द्यांवरून गेली अनेक वर्षे रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, तसेच महापालिकांच्या निवडणुकांना अखेर मुहूर्त सापडला आहे. येत्या आठवड्यात पहिल्या टप्प्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होणार आहे.

महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती आदींच्या निवडणुका तीन टप्प्यांत पार पाडण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती निवडणूक आयोगाच्या सूत्रांकडून देण्यात आली. पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचा, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती, तर तिसऱ्या टप्प्यात महापालिका निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होईल.

मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ ते २० जानेवारी २०२६च्या आत घेण्याचा आयोगाचा प्रयत्न राहणार आहे. नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी नोव्हेंबरमध्ये मतदान



होईल. नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना किंवा मतदानानंतर लगेच जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. अतिवृष्टी आणि पुरामुळे सरकारी यंत्रणा अजूनही ग्रामीण भागातील मदतकार्यात गुंतलेली आहे. त्यामुळे या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याचे खात्रीलायकरित्या समजते.

जिल्हा परिषद निवडणुकांची प्रक्रिया सुरू असताना महापालिका निवडणुकांची घोषणा होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी ३१ जानेवारी २०२६ची मुदत दिली आहे. निवडणुकीच्या दरम्यान किंवा नंतर न्यायालयीन प्रकरणे उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन महापालिका निवडणुका मुदतीपूर्वी १० दिवस आधी पार पाडल्या जातील, असे सूत्रांनी सांगितले.

दरम्यान, राज्यात प्रथमच मोठ्या संख्येने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होत आहेत. या निवडणुकांसाठी इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनचा (ईव्हीएम) तुटवडा भासू नये, यासाठी राज्य निवडणूक आयोगाने मशिन पुरवठ्यासाठी मध्य प्रदेश सरकारशी करार केला आहे. याशिवाय 'इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'कडून ५० हजार ईव्हीएम खरेदी केली आहेत. तसेच भारत निवडणूक आयोगाकडेही 'ईव्हीएम'ची मागणी करण्यात आल्याचे समजते.

तिन्ही टप्प्यांत पार पडणाऱ्या या निवडणुकांतील मतांची मोजणी एकत्रित होणे शक्य नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रत्येक टप्प्यातील निवडणुकांची मतमोजणी दुसऱ्या दिवशी होईल. निवडणूक यंत्रणेवरील ताण आणि मर्यादित मनुष्यबळ लक्षात घेता प्रत्येक टप्प्याच्या मतदानानंतर मतमोजणी होईल, असेही खात्रीलायकरित्या समजते



## संपादकीय....

### पर्जन्यसंकट

मराठवाड्यात दोन वर्षांपासून सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडल्यामुळे पूरपरिस्थितीची समस्या निर्माण झाली आहे. विभागाचे सरासरी पर्जन्यमान ७४८ मिमी असून, प्रत्यक्षात १०४१ मिमी पाऊस झाला आहे. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक १२२० मिलिमीटर पाऊस झाला आहे. विभागातील मोठ्या, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्पात पाणीसाठा पूर्ण झाला आहे. मराठवाड्याचे सरासरी पर्जन्यमान ७४८.५ मिलिमीटर आहे. सन २०२४मध्ये सरासरी ८८३ मिमी पाऊस झाला होता. यंदा पर्जन्यमानात वाढ होऊन ऑक्टोबर अखेरपर्यंत १०४१.८ मिलिमीटर पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा २९३ मिमी आणि गेल्या वर्षीच्या तुलनेत १५८ मिमी पाऊस अधिक झाला आहे. नांदेडचे सरासरी पर्जन्यमान ८८८ मिलिमीटर असताना यंदा १२२० मिमी पाऊस झाला आहे. हिंगोली जिल्ह्यातही पावसाचा कहर होता. जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ८५७ मिमी असताना यंदा ११७५.९ मिमी पाऊस झाला आहे. असमतोल पावसामुळे मराठवाड्याचे हवामान चक्र विस्कळित झाले आहे. ऑक्टोबर महिन्याच्या अखेरपर्यंत पावसाळी वातावरण कायम आहे. ढगाळ वातावरण आणि पाऊस असल्याने रब्बी हंगामासाठी मशागत रखडली आहे. अतिवृष्टीमुळे नदी-ओढ्यात पुराचे पाणी वाहत आहे. आवक वाढल्यामुळे धरणातून विसर्ग सोडलेला आहे. अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे मराठवाड्याचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, 'जलयुक्त शिवार योजने'त बहुतांश नद्यांचे खोलीकरण, रुंदीकरण आणि सरळीकरण करण्यात आले आहे. अतिवृष्टीत पाण्याची आवक अधिक असल्याने पाणी नदीपात्राच्या बाहेर आले. पाण्याला अटकाव करणारे झाडेझुडपे योजनेअंतर्गत कामात काढण्यात आल्यामुळे पात्रालगत असलेली शेतजमीन वाहून गेल्याचे प्रकार घडले आहेत. ही योजना पाण्याचे नियोजन करण्यात अयशस्वी ठरल्याचा ठपका विभागातील हवामान तज्ज्ञांनी ठेवला आहे. दरम्यान, नोव्हेंबरमध्ये देशभरात सर्वसाधारण (दीर्घकालीन सरासरीच्या ७७ ते १२३ टक्के) पावसाचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) वर्तवला आहे.

# कार्तिकी यात्रेसाठी पंढरपूर नगरपालिका प्रशासन सज्ज : मुख्याधिकारी महेश रोकडे

■ स्वच्छतेसाठी १५९८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती
■ तात्पुरती १२०० व कायमस्वरूपी ४३९७ शौचालय
■ स्वच्छतेसाठी नवी मुंबई महापालिकेसह जिल्ह्यातील नगरपालिकेचे पथके
■ मोफत ६ लाख पाणी व ३ लाख ज्युस बॉटल वाटपाचे नियोजन
* शहर सुरक्षेसाठी १४५सीसीटीव्ही , मुख्य रस्त्यांवर विद्युत रोषणाई








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिक शुद्ध एकादशी ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार असून, कार्तिक यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून सुमारे ८ ते १० लाख भाविक येतात. येणाऱ्या भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका प्रशासन सज्ज असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

कार्तिकी यात्रा कालावधीत शहरासह नदी पात्र, वाळवंट ,६५ एकर परिसर ,पत्रा शेड, प्रदक्षिणा मार्ग, मंदीर परिसर, वाखरी पालखी तळ आदी ठिकाणच्या स्वच्छतेसाठी जवळपास १५९८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये नगरपरिषद पंढरपूर चे ३५० कायम इतर १०० कर्मचारी तर जवळपास १०६८ हंगामी कर्मचारी व ८० सुपरवायझर तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून ५० स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक, जिल्ह्यातील इतर नगरपालिकेकडून जिल्हा प्रशासनामार्फत ३० पथके स्वच्छतेसाठी नेमण्यात आले आहेत. प्रशासनामार्फत पाणीपुरवठ्याच्या सर्व यंत्रणा सुस्थितीत असल्याची खात्री करण्यात आली आहे. कार्तिकी यात्रा कालावधीत महिलांच्या स्वच्छतेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरामध्ये वेगळ्या शौचालयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

तसेच तसेच वाळवंट परिसरात १५ ठिकाणी चेंजिंग रूम ची व्यवस्था करण्यात आली आहे. नदी पात्र, वाळवंट परिसर, ६५ एकर येथे हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आले असून, कक्षाच्या ठिकाणी सॅनिटरी नॅपकिन वेडींग मशिन बसविण्यात आले आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोअरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे.तसेच दररोज पिण्याच्या पाण्याची क्लोरीन टेस्ट केली जाणार आहे. भक्तीसागर, पत्राशेड, वाळवंट या ठिकाणी मोफत ६ लाख पाणी बॉटल व ३ लाख ज्युस बॉटल वाटपाचे नियोजन करण्यात आले आहे.शहरातील सुरक्षेसाठी १४५ सीसीटीव्ही, शहरातील मुख्य रस्त्यावर विद्युत रोषणाई, शहरातील १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्थेचे स्वच्छता व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

शहरासह ६५ एकर, वाळवंट, पत्राशेड आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या, कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, जेटींग, सक्शन मशीन आदी वाहनांच्या माध्यमातून स्वच्छता व कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यात्रा कालावधीत या घंटागाड्या सकाळी व रात्री अशा दोन वेळेस घरोघरीचा कचरा गोळा करतील.

त्याचबरोबर पत्राशेड, वाळवंट, ६५ एकर परिसर, रेल्वे मैदान आदी ठिकाणी तात्पुरते शौचालय उभारण्यात आले आहेत. तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी पाण्याच्या टिपा ठेऊन त्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून ९प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली आहे.

सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून, शहरातील व वाळवंटातील अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. वाहनतळावरती दिशादर्शक फलक लावण्यात आले असून, आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात येणार आहे. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यासह प्रदक्षिणा मार्ग, दर्शन बारी येथील लाईट दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच नदीपात्रात व घाटावर अखंडित व पुरेसा प्रकाश मिळावा यासाठी नदीपात्रात हायमास्ट पॉइंट्स, घाटांवर एलईडी दिवे चालू करण्यात आले आहेत.

यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांनी शौचालयाचा वापर करावा, सिंगल युज प्लास्टिकचा वापर टाळावा तसेच आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहनही मुख्याधिकारी श्री. रोकडे यांनी यावेळी केले आहे.

# महाड येथे आयोजित रिपाइं (आठवले) पक्षाच्या वर्धापनदिन कार्यक्रमास कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : राजाभाऊ ओव्हाळ यानी जिल्हा बैठकीत केले आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड ) : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) पक्षाची धाराशिव जिल्हा बैठक नुकतच येथील शासकीय विश्रामगृहात महाराष्ट्र राज्य जॉईंट सेक्रेटरी राजाभाऊ ओहाळ,यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष विद्यानंद बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

यावेळी राजाभाऊ ओव्हाळ मार्गदर्शन करताना म्हणाले दि.३ नोव्हेबर २०२५ रोजी महाड येथे केंद्रीय सामाजिक न्याय व आधिकारिता राज्यमंत्री नामदार रामदासजी आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली रिपाइं (आठवले ) पक्षाच्या ६८ व्या वर्धापण दिना निमित्तोने आयोजित राज्यव्यापी आधिवेशनास धाराशिव जिल्ह्यातील कार्यकर्त्यानी मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे आवाहन केले.

पुढे बोलताना ते म्हणाले की नामदार रामदास आठवले यांच्या आदेशाने लोकसभा व विधानसभाच्या निवडणुकीत आरपीआय पक्ष भारतीय जनता पार्टी सोबत सहभागी होऊन सदरील निवडणुकात महायुतीचे उमेदवार निवडून येण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून मदत करीत आला आहे म्हणून आता आम्हाला जिल्हा परिषद पंचायत समितीच्या व नगरपरिषद नगरपालिका नगरपंचायत च्या होऊ घातलेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने धाराशिव जिल्ह्यातील रिपाइं (आठवले) पक्षाला सन्मानपूर्वक जागा वाटपात सन्मान देऊन सहकार्य करून स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणूका महायुतीच्या माध्यमातूनच लढविण्यात याव्यात. त्या अनुसंघाने रिपब्लिकन कार्यकार्यानी कामाला लागावे असे ही आवहान त्यानी यावेळी बोलताना केले.

या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या अनेक इच्छुकांनी पक्षाकडे उमेदवारी मागणी अर्ज केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य मा.एस के चेले,मराठवाडा कार्याध्यक्ष आनंद पांडागळे,मराठवाडा विभाग उपाध्यक्ष भागवत शिंदे, मराठवाडा सचिव बंडूभाऊ बनसोडे,जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ ओहाळ,जिल्हा उपाध्यक्ष रणजीत गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष संदिपान कांबळे ,जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब म्हस्के, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे,जिल्हा सचिव एस.के. गायकवाड,जिल्हा सचिव लखन ओहाळ, धाराशिव तालुकाध्यक्ष भालचंद्र कटारे, धाराशिव शहराध्यक्ष उदयराज बनसोडे,नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे,महिला आघाडी सौ. आशाताई कांबळे,सौ. उषाताई खंडागळे,सौ.सुमनताई गायकवाड,तुळजापूर तालुकाध्यक्ष अरुण लोखंडे, तुळजापूर शहराध्यक्ष वैजिनाथ पांडागळे,युवक जिल्हा कार्याध्यक्ष धम्मशील कदम, लोहारा तालुकाध्यक्ष काकासाहेब भंडारे,युवक तालुका अध्यक्ष शुभम कदम,युवक तालुका कार्याध्यक्ष प्रदीप शिरसाठ, संघटन सचिव मुकेश मोठे,युवक नेते सूर्यनंद बनसोडे, रोहन दहिभाते सुहास झेंडे,कपिल ढगे, प्रवीण हुंबे, सौरभ लोंढे,महेश गायकवाड,अंकुश दत्ता बनसोडे, प्रतीक बनसोडे,आदीसह शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

# छंद जोपासून खेळाडूने खेळातून आपले करिअर घडवावे

**प्रभाकर दहीकर यांचे प्रतिपादन : येरंडी येथे बक्षीस वितरण कार्यक्रम**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : माणसाला अनेक छंद आणि आवड असतात. त्या मग खेळ ही शारीरिक व छंद असणारी बाब आहे. अनेक क्षेत्रात माणूस आपली प्रतिभा उज्ज्वल करतात. त्याचप्रकारे क्रिकेट खेळाडू यांनी छंद जोपासून खेळाडूने खेळातून आपले करिअर घडवावे. असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते व वन्यजीव मार्गदर्शक प्रभाकर दहीकर यांनी प्रतिपादन केले आहे. यावेळी प्रामुख्याने उपस्थित प्रभाकर दहीकर, कुणाल बोरकर, संघरत्न रंगारी, सागर रामटेके, रोहित रामटेके, संदेश खोब्रागडे आदी होते. सदर रात्रकालीन टेनिस बाल क्रिकेट स्पर्धा ही मालिनी दहीवले आदिवासी आश्रम शाळा येरंडी येथे सतत पाच दिवस पार पडली. (दि. २८) अंतिम सामना हा रात्री १२.३० वाजता समाप्त झाला.

याप्रसंगी अंतिम सामना हा सोनका पळसगाव व येरंडी या दोन क्रिकेट मंडळामध्ये मोठा चुरसीचा रंगला होता. यामध्ये पळसगाव यांनी प्रथम बक्षीस १६६६६ पटकावला. तर द्वितीय बक्षीस ११११११ येरंडी यांनी पटकावला आहे. या बक्षीस समारोप कार्यक्रमाचे संचालन व आभार मंडळाच्या पदाधिकारी यांनी केले आहे.

# वळसंग पोलिसांची कारवाई; तिल्लयाळ येथे तीन ठिकाणी हातभट्टी दारूवर छापा



सोलापूर : सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने वळसंग पोलीस ठाणे हद्दीत मौजे तिल्लयाळ येथे तीन ठिकाणी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या भट्ट्यांवर छापा टाकून कारवाई केली आहे. ही कारवाई श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, श्री. प्रीतम यावलकर, अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट उपविभाग श्री. विलास यामावर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. राहुल डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक श्री. रविराज कांबळे, तसेच पोलीस हवालदार श्री. श्रीशैल माळी, सुनील कुवर, अशोक पाटील, दर्याप्पा व्हाणमोरी आणि संतोष कुंभार यांनी सहभाग घेतला. छाप्यात एकूण १,४०० लिटर गुळमिश्रित रसायन आणि बॅरलसह ₹५०,४०० किमतीचा मुद्देमाल, तसेच ७० लिटर तयार हातभट्टी दारू (किंमत अंदाजे ₹७,०००) जप्त करण्यात आली. या प्रकरणी तीन आरोपींवर गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

# हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते यांना रस्त्यावर दुकान लावण्यास प्रतिबंध

**जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे आदेश**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिक शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. कार्तिकी शुध्द एकादशी रविवार दि. ०२ नोव्हेंबर, २०२५ रोजी असून, दि.२६ ऑक्टो. ते ०५ नोव्हें. कार्तिक यात्रा सोहळयासाठी सुमारे ०८ ते १० लाख भाविक पंढरपूरला येतात. यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना हातगाडीवाले, किरकोळ व फिरते विक्रेते साहित्य विक्रीसाठी रस्त्यावर बसलेले असतात. दर्शनासाठी आलेल्या भाविकांना विक्रेत्यांचा त्रास होऊ नये यासाठी , शिवाजी चौक परीसर, श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात साहित्य विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये दि. ३१ ऑक्टो रोजी सकाळी ०८.०० ते ०५ नोव्हेंबर २०२५ रोजीचे रात्री ०८.०० पर्यंत या कालावधीत हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते, फिरते विक्रेते तसेच उक्त परीसरातील दुकानदार यांना अतिक्रमण करण्यास, रस्त्यावर दुकान लावणे, साहित्य विक्री करणे यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी पोलीस प्रशासनाने करावी. सदर आदेशाचे उल्लंघन झालेस उल्लंघन करणारेविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ अन्वये कारवाईस पात्र राहिल. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित उपक्रमातून समाजात एकता, बंधुता आणि सौहार्दाचा संदेश**

# पडघा पोलिस ठाण्याच्या 'वॉक फॉर युनिटी' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भिवंडी तालुक्यातील पडघा पोलिस स्टेशनतर्फे 'वॉक फॉर युनिटी' (एकता दौड) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. बी. बी. जाधव विद्यालय नांदकर ते सोनटिकली नाका, तर बी.बी .पाटील इंग्लिश हायस्कूल कुरुंद ते आदर्श विद्यालय कुरुंद येथून पुन्हा त्याचं ठिकाणी परत येऊन स्पर्धेचा समारोप झाला. सुमारे पाच किलोमीटर अंतराची ही मॅरेथॉन , पोलिस पाटील,पडघा परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि पोलिस अधिकारी-अंमलदार यांच्या उत्स्फूर्त सहभागाने पार पडली. या उपक्रमाला पडघा विभागातून उल्लेखनीय प्रतिसाद मिळाला. वॉक फॉर युनिटी' उपक्रमाचा उद्देश समाजात एकता, सौहार्द, प्रेम आणि बंधुतेचा संदेश देणे हा होता. या माध्यमातून नागरिकांमध्ये परस्पर आदर, सहिष्णुता आणि शांततेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. सदर कार्यक्रम ठाणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. डी.एस. स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल , उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी पडघा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांच्या पुढाकाराने आयोजित 'वॉक फॉर युनिटी' उपक्रमात पोलिस पाटील, पडघा परिसरातील नागरिक, तळवली मदरसा ,बि.बी.पाटील स्कूल, आदर्श विद्यालय कुरुंद, बी. बी. जाधव विद्यालय नांदकर येथील विद्यार्थी, शिक्षक , सामाजिक संस्था, सामाजिक उद्योजक, ज्येष्ठ नागरिक तसेच पोलिस अधिकारी, अंमलदार यांनी उत्साहाने सहभाग घेत राष्ट्रीय एकतेचा आणि सामाजिक सौहार्दाचा संदेश दिला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कार्तिकी यात्रा : वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर प्रशासन सज्ज : गहिनीनाथ महाराज औसेकर

## सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य; वॉटरप्रुफ दर्शनमंडपाची उभारणी व अन्नछत्र; २५०० कर्मचारी / स्वयंसेवकांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : कार्तिकी शुध्द एकादशीला म्हणजे दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी कार्तिकी यात्रा संपन्न होत आहे. या दिवशी उपमुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेचा कालावधी दि.२६ ऑक्टोंबर ते ०५ नोव्हेंबर असा आहे. या यात्रेला सुमारे १० ते १२ लाख भविक पंढरपूरात येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सुविधा मंदिर समितीच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिति मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

यात्रा कालावधीत दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दर्शनरांगेत बॅरीकेटींग करून त्यावर वॉटरप्रुफ ताडपत्री शेड, जादा दर्शनमंडपाची निर्मिती, आपत्कालीन मार्ग, विश्रांती कक्ष, दर्शन रांगेत बसण्याची सुविधा, लाईव्ह दर्शन, कुलर-फॅन, मिनरल वॉटर, चहा - खिचडी आदी सुविधा उपलब्ध राहणार आहेत.








यात्रेनिमित्त भाविकांची होणारी गर्दी विचारात घेता, त्यांना सुलभ व जलद दर्शनासाठी प्राधान्य देण्यात आले असून, दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालविण्यासाठी अनुभवी सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच वैद्यकीय सेवेच्या दृष्टीने रूग्णवाहिका वैद्यकीय पथकासह, प्रथमोपचार केंद्र, स्वयंसेवी संस्थेमार्फत मोफत वैद्यकीय व्यवस्था असणार आहे. याशिवाय, आरोग्य विभागामार्फत श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप व रिध्दी सिध्दी दर्शनमंडप येथे आयसीयु, बाजीराव पडसाळी, सारडा भवन इत्यादी ठिकाणी आरोग्य व्यवस्था असणार आहे. महिला भाविकांच्या सोईसाठी सॅनिटरी नॅपकीन, हिरकणी कक्ष तसेच चंद्रभागा वाळवंट येथे चेंजिंग रूम उभारण्यात येत आहेत. याशिवाय, सोलापूर महानगरपालिका यांचेकडील रेस्क्यू व्हॅन प्रशिक्षित कर्मचा-यांसह, सिझफायर यंत्रणा, अत्याधुनिक १२५ सीसीटीव्ही कॅमेरे व त्यासाठी कंट्रोल रूम, वायरलेस यंत्रणा, जनरेटर, मेटल डिटेक्टर, मोबाईल लॉकर, चप्पल स्टँड, सार्वजनिक प्रसारण सुचना प्रणाली, चौकशी कक्ष, बँग स्कॅनर मशिन, अपघात विमा पॉलीसी आदी व्यवस्था करण्यात आली असल्याचे प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी सांगीतले.

स्वच्छतेसाठी विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले असून, मंदिर, दर्शनमंडप, तुकाराम भवन येथील स्वच्छता मंदिर कर्मचा-यांमार्फत व नगरप्रदक्षिणा, दर्शनरांग, मंदिर प्रदक्षिणा इ. ठिकाणची स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने करण्यात येत आहेत. या कामी स्वयंसेवी संस्थाची मदत घेण्यात येत आहे. दर्शनरांगेत नवमीपासून चहा-शाबुदाणा, तांदळाची खिचडी तसेच रिध्दी सिध्दी दर्शनमंडप येथे दशमी, एकादशी व द्वादशीला अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मंदिर समितीचे संकेतस्थळ (www.vitthal-rukminimandir.org), मोबाईल ॲप (''श्री.विठ्ठल रूक्मिणी देवस्थान, पंढरपूर'') वरून श्रीचे लाईव्ह दर्शन उपलब्ध असून पत्राशेड दर्शन रांग व मंदिर परिसरात एल.ई.डी. स्क्रिन बसविण्यात येत आहे. याशिवाय, देणगी घेण्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती, ऑनलाईन देणगीसाठी टठ उजऊए, ठढऋड, सोने-चांदी वस्तु दान करण्यासाठी स्वतंत्र कक्ष तसेच श्रींचा प्रसाद म्हणून बुंदी लाडूप्रसाद व त्यासाठी जादा स्टॉलची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच वेदांता, व्हीडीओकॉन व श्री.विठ्ठल रूक्मिणी या ३ भक्तनिवासामधील ३६१ रूममध्ये सुमारे १६०० भाविकांची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

सदर यात्रा निर्विघ्नपणे - सुरळीत पार पाडण्यासाठी व वारकरी भाविकांना केंद्र बिंदू मानून त्यांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मंदिर समितीचे सदस्य सर्वश्री आ.रामचंद्र कदम, शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड.माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, अतुलशास्त्री भगरे गुरूजी, ह.भ.प.शिवाजीराव मोरे परिश्रम घेत असून सुमारे २५०० कर्मचारी व स्वयंसेवक सेवा पार पाडणार असल्याची माहिति कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी दिली.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पंढरपूर दौऱ्यावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिक एकादशी सोहळा निमित्त राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे हे शासकीय महापूजा करणार असून उद्या दिनांक एक नोव्हेंबर रोजी पंढरी नगरी ती येणार आहे त्यांच्या हस्ते पर्यावरण दिंडी व दोन नोव्हेंबर रोजी पहाटे दोन तीस वाजता शासकीय महापूजा त्यांच्या हस्ते होणार आहे.

यंदा राज्यात अतिवृष्टी व महापूर असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी बत्तीस हजार कोटीची पैकी शेतकऱ्यांसाठी जाहीर केले. आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विठ्ठलाला सकाळी घालणार का याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा दौरा त्यांचा महत्त्वाचा मानला जात आहे. नुकत्याच जिल्ह्यांमधील माजी आमदार आणि भाज्यांमध्ये प्रवेश केला आहे. याचे निमित्त पालकमंत्री जयकुमार गोरे व आमदार कल्याण शेट्टी जिल्हा परिषद व पंचायत समिती स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहे त्यामुळे आता शिंदे गटाचे काय भूमिका असणार हे येणाऱ्या उद्याच्या दौऱ्यामध्ये समजले जाईल.

## प्रत्येक व्यापारी, मालमत्ता धारकांशी चर्चा करणार; कॉरिडॉर होणार : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरातील येणाऱ्या भाविकांना अतिशय चांगल्या सुख सुविधा मिळाव्यात यासाठी उज्जैन को वाराणसीच्या धर्तीवर पंढरपुरात कॉरिडॉर करण्यात येणार आहे कोर्टामध्ये पहिल्या टप्प्यात सुमारे ६३० मालमत्ता बाधित होणार आहेत. त्यांना योग्य मोबदला देण्यासाठी प्रत्येक मालमत्ता धारक व व्यापारी यांच्याशी चर्चा करून यांची मते जाणून घेणार आहेत. मात्र कॉरिडॉर होणारच असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

कार्तिक यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी पंढरपूर मध्ये आले असता त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी हे बोलत होते. पंढरपुरात कॉरिडोर करण्यासाठी भूसंपादन करण्याची प्रक्रिया लवकरच करण्यात येणार आहे. त्यातील मालमत्ता धारकांना योग्य मोबदला देण्यात येणार आहे. तरी काही मालमत्ता धारकांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे. मालमत्ता धारक न्यायालयात गेली तरी कॉरिडॉर रद्द होऊ शकत नाही. असे सांगून कुंभार आशीर्वाद म्हणाले की मालमत्ता धारक ही गरीब श्रीमंत आहेत. प्रत्येकी मालमत्ता दारका बरोबर वैयक्तिक बैठक घेऊन त्यांच्या अशा अपेक्षा जाणून घेणार आहोत

कॉरिडॉर मध्ये बाधित होण्याने व्यापाऱ्यांना दुकाने देण्यात येणार आहेत. काही मालमत्ता धारक आमच्या संपर्कात आहेत व काही मालमत्ता धारकांनी कॉर्डर व्हावा अशी मागणी केली आहे. काही मालमत्ता धारकांनी गावाबाहेर प्लॉट खरेदी केली आहेत. कॉरिडोर झाल्यानंतर भाविकांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे अर्थकारणाला गती मिळणार आहे असेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

पंढरपुरात कॉरिडोर करण्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष केंद्रित केले आहे व त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना मालमत्ता धारकांना विश्वासात घेऊन त्यांना योग्य मोबदला देऊन कॉरिडॉर करावा अशा सूचनाही दिल्या आहेत. त्यामुळे गेल्या महिन्यापासून कॉर्नर बाधित मालमत्ता धारकांची अधिकारी चर्चा करत आहेत. व त्यांचे म्हणणे. व त्यांच्या अशा अपेक्षा जाणून घेत आहेत.

## आष्टा कासार येथील विद्यार्थ्यांचा २७ वर्षानंतर एक अनोखा स्नेह मेळावा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : लोहारा तालुक्यातील आष्टा कासार येथील हायस्कूल चा माजी विध्यार्थी मेळावा दि.२४ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

तब्बल २७ वर्षानंतर सर्व वर्गमित्र-मैत्रिणीं अत्यंत उत्साहाने सहभागी झाले होते, पुणे, मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, नांदेड, गुजरात इत्यादी भागामध्ये आपल्या कामानिमित्त, नोकरी निमित्त, उद्योगधंद्यात व्यस्त असणारे सर्वच एक दिवस स्वतःसाठी स्वतःच्या आनंदासाठी सर्व मित्र-मैत्रिणींना भेटण्यासाठी आतुर होऊन हजर होते.

त्यावेळी शिकवलेले गुरुजी आणि कार्यरत शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आष्टा हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक ओमप्रकाश चौधरी होते.

सरस्वती पूजन करून राष्ट्रगीताने सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रशालेतील दिवंगत माजी शिक्षक व जे विद्यार्थी मयत आहेत त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

एक अतूट बंधन टॅक लाईन असलेल्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन करतेवेळी प्रस्तावना मुकेश सोमवंशी यांनी सादर केले, तर शिक्षकांचा सत्कार समारंभ आणि कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन धनराज आळंगे यांनी केले.उपस्थित सर्व गुरुजीचा सन्मान करण्यात आला.

विध्यार्थ्यांमधून मनोगत व्यक्त करताना गुळे बालाजी यांनी आपल्या शालेय जीवनातील आणि आयुष्यातील संघर्षमय अनुभव सांगितली. तसेच मैत्री वर आधारित गीत आणि कविता गाऊन कार्यक्रमाची विलक्षण रंगत वाढवली. त्याचबरोबर विश्वंभर शिंदे, कविता राठोड, छाया स्वामी, सविता मोटे, सुनीता सुलतानपुरे यांनी गीत गाऊन त्यांचे मनोगत व्यक्त केले.

शिक्षकांच्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांनी आयुष्यामध्ये त्याग आणि ज्ञान महत्त्व प्रदीप फुंडीपल्ले यांनी व्यक्त केले, मुख्याध्यापक सावंत यांनी विद्यार्थ्यांना शाळेबाबतची गोडी निर्माण व्हावी व शाळेसाठी आपण सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोप शरणप्पा फुंडीपल्ले यांनी करतेवेळी त्यांच्या खास शैलीत विद्यार्थ्यांना जुन्या आठवणीत नेले आणि सध्याच्या पिढीने आपल्या आई वडिलांची काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले तर कार्यक्रमाचे आभार सदाशिव सोमवंशी यांनी व्यक्त केले.

विशेषबाब म्हणजे सर्व मित्र हे एकच ड्रेस कोडमध्ये पांढरा नेहरू शर्ट व विजार आणि मैत्रिणींचा गुलाबी साडी पेहराव केला होता.

हा कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी सर्वजण प्रयत्न करत होते पण तरीही गेली अनेक वर्ष मुलां-मुलींना एकत्रित करण्याचे काम केले त्यात महादेवी कोळी, अनिता कोरे, सविता मोटे यांनी सर्व मुलींची जबाबदारी घेतली तर गेट टुगेदरची संकल्पना रवींद्र मारेकर, विश्वंभर शिंदे, रामचंद्र चौधरी, खंडू सुलतानपुरे, गुणवंत माने यांनी मांडली.

हा कार्यक्रम यशस्वीते साठी प्रेमनाथ दासीमे, महादेव रनखांब, पाशा खुटेपड, संजय शिदोरे, महेश सूर्यवंशी, बसवराज कोंडे, प्रशांत आळंगे, मुकेश सोमवंशी, धनराज आळंगे यांनी परिश्रम घेतले.

**पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनाची पालन करून सहकार्य करावे**

**उपविभागीय अधिकारी डगळे यांचे आव्हान**

## कार्तिक यात्रेच्या भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज : उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिक शुद्ध एकादशी दोन नोव्हेंबर २०२५ रोजी असून, या यात्रा कालावधीत पंढरपुरातील श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात, वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्भिग्नपणे पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा माहिती उपविभागी पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

कार्तिक वारी पोलीस प्रशासनाचे वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षा तसेच अतिक्रमण मोहीम प्राधान्यांनी दिले असून सुरक्षेसाठी वाहतूक नियंत्रणासाठी ३००० ५७ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे यामध्ये एक पोलिस अधीक्षक एक अप्पर पोलीस अधीक्षक १२ पोलीस उपनिरीक्षक, तीस पोलीस निरीक्षक, १२७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, व पोलीस उपनिरीक्षक १३८६ पोलीस अंमलदार, १५०० होमगार्ड तसेच, ०२ एस आर पी एफ कंपनी, ०४ बीडीएस पथके, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशिक्षित १० कार्ट पतके, नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने ०८ ठिकाणी पतके स्थापन करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणतेही अनुसूचित प्रकार घडून येण्यासाठी नदीपत्रात, ६५ एकर, महाद्वार घाट पत्राशीड यास आधी ठिकाणी बारा वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॅन ची स्थापना करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या विषयात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच वारकरी भाविकांना सदरची कोणत्याही अडथळा येऊ नये यासाठी ०५ अतिक्रमण पथके, नेमण्यात आली आहे वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट, तसेच अंबाबाई पटांगण आधी ०७ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी धोनीचे पण यंत्रणा कार्यावित करण्यात आले आहे.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहतुकीची कोणताही अडथळा होऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतूक शहराबाहेरून वळविण्यात आले आहे. तसेच वाहतूक नियमानासाठी शहराबाहेर बारा तर शहरांतर्गत दहा ठिकाणी ड्रायव्हशन पॉईंट सुरू करण्यात आले आहेत त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबवण्यासाठी शहरात व शहराबाहेर १६ ठिकाणी वाहन तळ व्यवस्था करण्यात आली असून या ठिकाणी सुमारे दहा ते अकरा हजार वाहनांची पार्किंग व्यवस्था होणार आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षितेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनाची पालन करून सहकार्य करावे असे आव्हानही उपविभागीय अधिकारी श्री डगळे यांनी केले आहे.

# चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी : पालकमंत्री जयकुमार गोरे



## कार्तिक यात्रा नियोजन बैठकीत पालकमंत्र्यांनी दिल्या सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी या प्रमुख यात्रांसह एकादशी दिवशी लाखो भाविक तसेच दररोज हजारो भाविक पंढरपूरला येतात. विठुरायाच्या दर्शनाची आस घेऊन येणाऱ्या लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनासोबत चंद्रभागेचे स्नान केल्याशिवाय वारी पुर्ण केल्याचे समाधान मिळत नसते त्यामुळे वारकरी संप्रदायात विठ्ठल रुक्मिणी दर्शना एवढेच चंद्रभागेच्या पवित्र स्नानाला महत्त्व असल्याने चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर कायम स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी अशा सूचना, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या.

कार्तिक यात्रा नियोजनाबाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथील सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अध- ीक्षक डॉ दीपक धोत्रे यांच्यासह संबंधित विभागाचे विभाग प्रम ुख उपस्थित होते.

य ा व े ळ ी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, मंदिर समिती व नगरपालिका प्रशासनाने चंद्रभागा वाळवंट व मंदिर परिसर येथील वारी कालावधीतच स्वच्छता न करता दररोज स्वच्छता करावी. श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना स्वच्छता पाहून समाधान वाटले पाहिजे. तसेच वाळवंटात ज्यादा तात्पुरत्या शौचालयाची सुविधा उप-लब्ध ठेवावी त्याचबरोबर वाळवंटात कायमस्वरूपी पर्यावरण पूरक शौचालय स्थापन करण्याबाबतचे नियोजन करावे. उघड्यावर शौचालयास बसू नये यासाठी जनजागृती व आवश्यक उपाययोजना कराव्यात. दर्शन रांगेतील भाविकांना तात्काळ व सुलभ दर्शन व्यवस्था व्हावी यासाठी मंदिर समितीने व्हीआयपी दर्शन तसेच दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याचबरोबर भाविकांना सुर-क्षा रक्षकांचा नाहक त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन, सुरक्षारक्षकांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित सुरक्षा रक्षक नेमावेत.

चंद्रभागा नदी स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते यासाठी आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत सुस्थितीत बोटी तसेच प्रशिक्षक कर्मचारी सज्ज ठेवावेत. महामार्ग प्राधिकरणाने अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावेत चंद्रभागा एसटी स्टँडवर स्वच्छता व सुलभ सौचालयाची व्यवस्था करावी. राज्य उत्पादन शुल्क विभागाने वारी कालावधीत अवैध दारू विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोलीस प्रशासनाने वाहतूक व्यवस्थेबाबत नियोजन करावे. आषाढी वारी प्रमाणेच कार्तिकी यात्रेत भाविकांना सुविधा द्याव्यात आषाढी यात्रा कालावधीत सर्व विभागाने उत्तम नियोजन केल्याने आषाढी वारीत भाविकांमधून समाधान व्यक्त केले जात होते त्याच पद्धतीने कार्तिक वारीतही नियोजन करावे अशा सूचनाही पालकमंत्री श्री गोरे यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समिती, नगरपालिका, आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, एसटी महामंडळ, राज्य उत्पादन शुल्क, अन्न व औषध प्रशासन, महावितरण आदी विभागांचा आढावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी घेतला.

**पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली दर्शन रांग व पत्रा शेड येथील पाहणी**

कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूरात मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शनरांग , पत्राशेड येथे मंदिर समितीकडून आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केल्या जातात. या ठिकाणी देण्यात आलेल्या सोयी सुविधांची पाहणी आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केली.

यावेळी त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्याधिकारी कुलदीप जंगम, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.



यावेळी दर्शनरांगेतील भाविकांना मंदीर समितीकडून मोफत अन्नदान सुरु असून आज पालकमंत्री श्री गोरे यांच्या हस्ते दर्शन रांगेतील भाविकांना अन्नदान करण्यात आले. तसेच त्यांनी वारकरी भाविकांशी संवाद साधून उपलब्ध सुविधाबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी मंदिर समितीकडून वारी कालावधीत दर्शन रांगेतील भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली तसेच भाविकांना सुलभ व जलद दर्शनाला प्राधान्य देण्यात आले असून दर्शन रांग द्रुतगतीने चालावी यासाठी ज्यादा सुरक्षा रक्षक नेमण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

---

# औसा नांदुर्गा पंचायत समिती अंतर्गत सारणी पंचायत समितीसाठी शिवसेना (उ बा ठा) पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी रतन सोमनाथ तमशेट्टी आग्रही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा, प्रतिनिधी/अमर जाधव :

औसा तालुका शिवसेना (उ बा ठा) पक्षाची पंचायत समिती निष्ठावंत कार्यकर्ता मिळणार का?

नांदुर्गा पंचायत समितीला शिवसेना पक्षाचे रतन सोमनाथ तमशेट्टी यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे

रतन तमशेट्टी शिवसेना पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आ-हेत

रतन तमशेट्टी यांनी राजकीय जीवनाला सुरुवात करताना शिवसेनेच्या माध्यम ातून औसा विधानसभा व धाराशिव लोकसभेच्या वेळेस पूर्ण ताकतीने प्रचाराच्या वेळेस प्रचार करून आपल्या उमेदव-ारास प्रचाराच्या माध्यमातून मदत केली

सारणी ग्रामपंचायतला सलग पंधरा वर्ष उपसरपंच म्हणून काम पाहत आहेत अनेक मतदाराचे अडीअडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न केले

शिवसेनेचे खासदार आद-रणीय ओमराजे निंबाळकर



यांच्यासोबत तर औसाचे माजी आमदार दिनकररावजी माने यांच्यासोबत व बाजार समितीचे उपसभापती संतोषी सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली कायम निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून औसा तालुक्यामध्ये तमशेट्टी हे सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात नांदुर्गा पंचायत समि तीच्या आठ ते दहा गावांमध्ये त्यांची वेगळी ओळख आहे अनेक नेते मंडळी व कार्यकर्ते यांनी त्यांना उमेदवारी मिळावी म्हणून पक्षकडे जोर धरून आहेत

सर्वसाधारण घराण्यामधील व एका खेडेगावातील तरुण व तडफदार कार्यकर्त्यांना उमेदव-ारी मिळेल का याकडे नांदुर्गा पंचायत समिती अंतर्गत गावाम ध्ये जोरदार चर्चा सुरू

# संगिता रिंढे यांना राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा तालुक्यातील मोहाडी येथील माजी सरपंच सौ . संगिता ताई शिवदास रिंढे यांना राष्ट्रीय सम ाज रत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. सदर पुरस्कार तथ-ागत बहुद्देशीय संस्था मेहकर व्दारा संचालित राजमाता माँ . जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट. जिवन दिप अनाथ आश्रम .व वृध्द आश्रम तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना यांच्या वतीने देण्यात येणार आहे. मोहाडी या लहानश्या गावात स्व. रामचंद्र रिंढे गुरुजी शिक्षक पदावर कार्यरत असताना.त्यांना अध्यात्मिक क्षेत्रात परीसरात आपल्या विचारांचा ठसा उम टविला होता.व तसेच आपल्या परीवाराला अध्यात्मिक क्षेत्रातील संस्कार जतन करून.आपल्या वडीलांचा वरसा व वसा चालु ठेवत आध्यात्मिक सामाजिक राजकीय क्षेत्रात.श्री .शिवदास रामचंद्र रिंढे यांनी सिंदखेडराजा तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष पद.सलग दहा वर्षे भुषविले आहे. प्रशासकीय काळात कृषी उत्पन्न बाजार समितीत संचालक होते. नवनिर्वाचित बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमेटीच्या सरचिटणीस पदावर कार्यरत आहेत . शिवदास रिंढे यांच्या पत्नी . सौ . संगिता ताई शिवदास रिंढे यांनी काही महीन्या पुर्वी स्व. रामचंद्र रिंढे गुरुजी त्यांचे निधन झाले असून सौ संगिता ताई रिंढे यांनी सासरे यांची वडीलाप्रम ाणे अतोनात सेवा करून सासरे यांचे अध्यात्मिक



विचार.पत्ती यांचे सामाजिक राजकीय विचार जोपासून .म ोहाडी गावच्या सरपंच पद-ावर कार्यरत असताना गावच्या विकासासाठी योग्य निर्णय घेऊन गाव विकासात्मक उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल हा सौ . संगिता ताई शिवदास रिंढे यांना प्रतिष्ठेचा पुरस्कारा दिला जात आहे. स्मृतीचिन्ह, सन्म ानपत्र व पंचरंगी दुपटा असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मला जाहीर झालेला राष्ट्रीय समाज रत्न पुरस्कार हा माझे सासरे स्व.रामचंद्र रिंढे गुरुजी यांच्या आशिर्वादाने मिळाला असून मि त्यांना समर्पित करणार आहे असे सौ.संगिताई रिंढे यांनी म्हटले आहे. मिळालेल्या पुरस्काराबद्दल संगिता ताई यांचे जिल्हाभरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---



# केंद्रीय मंत्री मा. चिराग रामविलास पासवान यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय कळंब येथे रुग्णांना फळे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री अन्नप्रक्रिया मंत्री क्रीडामंत्री मा.चिराग रामविलास पासवान यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय कळंब येथे रुग्णांना फळे, बिस्किटे देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी लोक जनशक्ती पार्टी चे धाराशिव जिल्हाप्रमुख राजाभाऊ गायकवाड. ता. अध्यक्ष. भारत कदम, शहर प्रमुख नागेश धीरे. दिपक हौसलमल, व पार्टीचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यामुळेच एकसंघ भारताचे स्वप्न साकार झाले : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : सरदार वल्लभभाई पटेल यांनी राजनैतिक कौशल्य, दृढ निश्चय व शौर्याने ब्रिटिशकालीन संस्थाने भारतात विलीन केली, त्यामुळे एकसंघ भारत निर्माण करण्याचे स्वप्न साकार झाले, म्हणून त्यांच्या प्रेरणादायी कार्यापासून आदर्श घेऊन राज्यकर्त्यांनी देश व राज्य हितासाठी कठोर निर्णय घ्यावेत असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद सम ाजकल्याण संस्था संचलित म ातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी



महाविद्यालयातील राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, प्रा विठ्ठल वाघमारे, संतोष वगाले, चेतन जाधव, मुख्याध्यापक मलकप्पा भरम शेट्टी उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र चळवळीत बारडोली सत्याग्रहाचे नेतृत्व केल्याबद्दल जनतेने त्यांना सरदार ही उपाधी दिली. देश स्वतंत्र झाल्यानंतर देशातील ५६२ संस्थानिक स्वतंत्रपणे राज्य करत होते. त्यामुळे देश एकत्रित ठेवण्याचा कठीण प्रश्न निर्माण झाला होता, हा जटिल प्रश्न सरदार पटेल यांनी चर्चेद्वारे सोडविला म्हणून ते भारतीय एकतेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा सौरभ भस्मे यांनी केले तर प्रा मनीषा शिंदे यांनी आभार मानले कार्यक्रमास प्रा हर्षदा गायकवाड, प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे उपस्थित होते.

**विद्यार्थी व मान्यवरांनी घेतली एकतेची शपथ**

**सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमि त्त देशाचे सार्वभौमत्व आबादी ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील,अशी एकतेची शपथ महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी तसेच मान्यवरांनी घेतली**

**राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने जयंतीनिमित्त कार्यक्रम**

---

श्रामनेर शिबिर उत्साहात साजरा

प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन

# बालपणापासूनच बौद्ध श्रामणेर संस्कार रुजवावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : अर्जुनी मोरगाव तालुक्यातील इटखेडा येथे दहा दिवसीय श्रामनेर शिबीर मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. नागवंशीय बहुजन समाजाची श्रमन संस्कृती जोपासण्याची जी परंपरा आहे. ती तथागत भगवान बुद्धांच्याच विचारातच आहे. या उदात्त हेतूने, इटखेडा येथील दीक्षाभूमी या ठिकाणी दहा दिवसीय श्रामनेर शिबीर मोठ्या थाटात संपन्न झाले. म्हणून बाल-पणापासूनच बौद्ध श्रामणेर संस्कार रुजवावे.

श्रामनेर शिबीराला प्रशिक्षण देण्यासाठी, व त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, भदंत धम्मरक्षित थेरो चैत्य भुमी मुंबई. व श्राम नेर संघाला धम्माचा प्रशिक्षण देण्यासाठी केंद्रीय वरिष्ठ शिक्षक ए. जी. तायडे हे उपस्थित होते. दहा दिवसीय श्रामनेर शिबीराला यशस्वी करण्यासाठी, भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष आर. के. जांभुळकर, सोनदास गणविर, नागेंद्र खोब्रागडे, रमेश लाडे, हिरालाल कोटांगले, सरपंच श्रीकांत लोणारे, सुभाष लाडे, मोरेश्वर धारगावे आदी उपस्थित होते.

ईटखेडा दीक्षाभूमी या गावी एक बौद्ध विहार, एक संघ एक विचार, कसल्या ही गोष्टींचा कोणत्याही व्यक्ती विषयी, भेदभाव नाही. असा बौद्ध समाज आणि ओ. बि. सी. बांधवांनी दहा दिवसीय श्रामनेर शिबीर यशस्वी रित्या पार पडला. त्यात तरुण मुलांची एक संघ वृत्ती, स्वाभीमान बाणा, आणि रात्रंदिवस काम करण्याची सेवाभावी वृत्ती पाहुण, कोणत्याही गावातील लोकांनी, त्यांचा आदर्श घ्यावा, असी एकजुट संघटना ईकखेडा वासियांची आहे. बौद्ध धम्माची सेवा करण्यासाठी तरुण प्रौढ महिलाही मनोभावे सेवा देण्यासाठी तयार असतात. तथागतांचा बौद्ध धम्महाडॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. त्यांच्या विचारांवर समाज एकसंघ चालत आहे. दहा दिवसीय श्रामनेर शिबीरात २७ श्रामनेर, दहा दिवस बुद्ध, धम्म, संघांचा, अभ्यास करून, आपले उर्वरित जिवन, समाजामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी, प्रयत्न करणार करणार असे विचार म ांढले. श्रामनेर संघाला आमन्त्रीत करुन, भोजन दानासाठी आमंत्रीत करण्याचा स्वामी मान, पुण्य बल पदरात पाडण्यासाठी, माहुर कुडा, निमगाव, बाराभाटी, बोळदे, करडगाव, अर्जुनी,मोरगाव, परसटोला, जानवा, इटखेडा, म




हागाव, सिरोली, ह्या गावांनी श्राम नेर संघाला आमंत्रीत करुन भोजन दान करून पुण्य अर्जित केले.

आनंद बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष सिदधार्थ सुखदेवे, मोरेश्वर गोंडाने, जनार्दन मेश्राम, स्पंदन लोणारे, संजय लोणारे, गौरव गोंडाने, संघर्ष मेश्राम, अनिकेत गोंडाने, मंथन लोणारे, धम्मदिप गोंडाने, रितेश गटपाल, संदेश गडपाल तन्मय गोंडाने, प्रतीक गोंडाने, उज्वल लोणारे, साहिल लोणारे, स्वप्निल मेश्राम आदी गावकरी मंडळीनी सहभाग घेवून सहकार्य केले.